# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 08/09/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. काटोल :- अंतर्गत 06 कि.मी अंतरावरील वाढोना येथे दिनांक 06/09/2021 चे 18.30 वा. ते 19.00 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) सचीन खुशीलाल खरपुरीया वय 28 वर्ष, रा. वाढोना ता. काटोल याने निशांत भैय्यालाल मोहरीया(जखमी), वय 31 वर्ष, रा. वाढोना ता. काटोल याला "तु एस.सी. समाजाची मुलगी आणली" असे म्हटल्याने त्यांच्यामध्ये वाद झाला. त्याचा जाब विचारण्याकरीता जखमी हा आरोपीच्या घरी गेला व तेथे दोघांचे भांडण झाले. भांडन दरम्यान आरोपी याने घरातील लोखंडी रॉडने जिव घेण्याच्या उददेशाने निशांत मोहरीया याला डोक्यावर मारून गंभीर जखमी केले. तसेच आरोपी क्र 2) दिनेश हिरालाल खरपुरीया वय 41 वर्ष रा. वाढोना ता. काटोल याने निशांत मोहरीया याच्या कमरेला पकडून धडीच्या (पायरी) खाली फेकले.

सदर प्रकरणी फियादी नामे- श्रीमती लीलाबाई भैय्यालाल मोहरीया वय 52 वर्ष, रा. वाढोना ता. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 307, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. निंभोरकर मो.क्र 9527347443 हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. मौदा :- अंतर्गत गुमथळा येथे दिनांक 04/09/2021 ते दिनांक 07/09/2021 दरम्यान फिर्यादी नामे- रजत अशोक कुमार रूईया वय 30 वर्ष रा. लकडगंज नागपुर यांची अरीहंत रूफींग आर आर इंडीट्रीयल पार्क कंपनी गुमथाळा येथुन आरोपी नामे- 1) रविंन्द्र रतिराम पातोळे, वय- 44 वर्ष, रा. गुमथळा, तह. कामठी व 2) सज्जनलाल धुपलाल भलावी, वय 63 वर्षे, रा. गैढबरा, तह. पारशिवनी यांनी कलरचा पेन्ट असलेली टिन 300 किलो स्कॅप लोहा एकुण किंमती 39,000/-रु. चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक सोनकर मो.क्र. 8975921770 हे करीत आहे

2) पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील येथे दिनांक 05/09/2021 चे 18.00 वा. ते दिनांक 07/09/2021 चे 10.30 वा. दरम्यान वेकोली सिल्लेवाडा येथे बंकर नं 04 येथील कन्वेयर बेल्ट चालविण्याकरीता इलेक्ट्रीक पोल पासुन ते स्विच रूमपर्यंत तसेच स्विच रूमपासुन कन्वेयर बेल्ट पर्यत विदयुत पुरवठा करण्याकरीता लावण्यात आलेले आरर्मर केबल 35 मिटर कि. 41,000/- रू चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- संजय देवराव काम्बले, वय 57 वर्ष सहा सु उपनिरीक्षक यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पिसे मो नं 9881377348 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर